महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांक- कअनि - १११८ /प्र.क्र.१ /१४-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०१८

<u>संदर्भ :</u> राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे का.आ.क्र.रानिआ - २०१५/५१३/का-२ दिनांक २९.१२.२०१७

आदेश

श्री.संजय मधुकर हेन्द्रे, कक्ष अधिकारी, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग हे राज्य निवडणूक आयोग, मुंबई या कार्यालयात दिनांक ०१.०४.२००५ पासून प्रतिनियुक्तीने कार्यरत होते. श्री. हेन्द्रे, कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीच्या सेवा संदर्भाधीन आदेशान्वये दिनाक ३०.१२.२०१७ (म.नं.) पासून प्रत्यावर्तित करण्यात आल्या आहेत.

२. सदर आदेशास अनुसरून श्री. सं.म. हेन्द्रे, कक्ष अधिकारी यांची प्रतिनियुक्तीच्या सेवा प्रत्यावर्तनानंतरची पदस्थापना सामान्य प्रशासन विभागामध्ये कक्ष अधिकाऱ्याच्या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

३. श्री. सं.म. हेन्द्रे, कक्ष अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागामध्ये तत्काळ रूजू व्हावे.

४. श्री. सं.म. हेन्द्रे, कक्ष अधिकारी यांच्या सेवा दिनांक ३०.१२.२०१७ (म.नं.) पासून मूळ विभागाकडे प्रत्यावर्तित करण्यात आल्या आहेत. श्री.हेन्द्रे, कक्ष अधिकारी यांचा दिनांक ३१.१२.२०१७ ते आदेशाच्या दिनांकापर्यंतचा सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करण्याची कार्यवाही म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ९(१४)(एफ) नुसार व शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०२.०६.२००३ मधील तरतुदीनुसार सामान्य प्रशासन विभागाने करावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११०१५४५३९१४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan
Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.01.10 15:49:42 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

श्री.सं.म.हेन्द्रे, कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

प्रत

१) अपर मुख्य सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२) प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

३) सह/ उप सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग/ उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) निवडनस्ती (कार्या-१४ ब).